# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ / श्रावण ३, १९४५ (शके)**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

## मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील महर्षी कर्वे मुलींच्या वसतिगृहातील आंदोलनकर्त्या विद्यार्थिनींवर सूडबुद्धीने कारवाई केल्याबाबत

**(१) * १९५४८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील महर्षी कर्वे मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींनी पाणीटंचाई आणि आवश्यक सोयी-सुविधां मिळत नसल्याने वसतिगृह अधिक्षकांच्या घराबाहेर रात्रभर केलेल्या ठिय्या आंदोलनामुळे वसतिगृह अधीक्षकांनी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्षाचे नियोजन असलेले परिपत्रक दाखवत विद्यार्थ्यांना वसतिगृह सोडण्याचे आदेश दिल्याचे नुकतेच माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधीक्षकांच्या विरोधात युवा सेनेने मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुंकडे माहे मे, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील महर्षी कर्वे मुलींच्या वसतिगृहातील आंदोलनकर्त्या विद्यार्थीनींवर सुडबुद्धीने कारवाई करणाऱ्या वसतिगृह अधीक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) वसतिगृहातील विद्यार्थीनींनी पाणी टंचाईच्या संदर्भात आंदोलन केले होते. तथापि, विद्यार्थिनींना वसतिगृह सोडण्याचे कोणतेही आदेश किंवा परिपत्रक देण्यात आले नाहीत.

विद्यार्थी जेव्हा वसतिगृहात प्रवेश घेतात तेव्हा शेवटच्या सत्रातील परीक्षा संपल्यावर ५ दिवसाचा कालावधी वसतिगृह रिकामे करण्यासाठी दिला जातो.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) वसतिगृहातील विद्यार्थीनींची कोणतीही गैरसोय होवू नये, यासाठी पाण्याची समस्या सोडविण्यात आली असून, वसतिगृहामध्ये कुठल्याही प्रकारची अस्वच्छता नसून, स्वच्छता कर्मचाऱ्यांमार्फत वेळोवेळी स्वच्छता करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळूज ते कमळापुर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत

**(२) * १८८३४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज ते कमळापूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील रस्ता नकाशानुसार ८० फुटांचा असून, हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळूज येथील औद्योगिक वसाहतीकडे जाणारा रस्ता पुढे रांजणगांव शे.पु.पर्यंत हा मुख्य मार्ग असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर जडवाहनांची वाहतूक होत असल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे मोठे खड्डे पडले असून मागील अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरुस्ती केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती किंवा नवीन रस्ता बांधकाम करण्याबाबत तेथील स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळूज ते कमळापूर रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) वाळूज (कि.मी.३३/००) ते कमळापूर (कि.मी.३७/००) ही लांबी वाळूज-कमळापूर- रांजणगांव प्रजिमा ४३ चा भाग आहे. सदर रस्त्याच्या धावपट्टीची रुंदी ३.७५ मीटर इतकी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत निवेदन प्राप्त आहे.
(४) वाळूज ते कमळापूर या ४ कि.मी. लांबीपैकी ३ कि.मी. लांबीतील रस्ता सुधारणा करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर रस्त्यावर १ कि.मी. लांबीत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे व बांधीव गटाराचे मंजूर काम सद्य:स्थितीत प्रगतीत असून मे, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदरील रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) * १९९०८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षण विभागातील बहुतांश प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेच्या १५०३ शाळा असून या शाळांमधील अंदाजे ३०९९ शिक्षकपदे मंजूर असून त्यापैकी ७५० पदे रिक्त असून सन २०२४ मध्ये यापैकी २९० शिक्षकांची सेवानिवृत्ती होणार असल्याचे व वर्धा जि.प. अंतर्गत प्राथमिक शिक्षकांचे जवळपास ७०० पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, तसेच शिक्षक, केंद्रप्रमुख यांची रिक्त पदे भरण्याची मागणी शिक्षक भारती आणि विविध संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ ते ३ मार्च, २०२३ या कालावधीत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीचे आयोजन करुन राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकांची पदे भरण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पदे शासन भरत नसल्याने रिक्त जागांचा आकडा दरवर्षी वाढत असतो, काही जागा समायोजन प्रकियेने भरण्यात येत असल्या तरी रिक्त जागांचा अनुशेष भरुन निघत नसल्याने याचा विपरित परिणाम या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हा परिषदेच्या १५०३ शाळा असून, ४०५७ शिक्षकीय पदे मंजूर आहेत. जिल्हा परिषद, नागपूर येथे ६५६ व जिल्हा परिषद, वर्धा येथे २८० शिक्षकीय पदे रिक्त आहेत.
तसेच, शिक्षक व केंद्रप्रमुख यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात विविध संघटनांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

राज्यातील शिक्षकीय रिक्त पदांपैकी ३०,००० पदे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, मा.न्यायालयाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास अंतरीम स्थगिती दिली असल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन तसेच पदभरतीसंदर्भात कार्यवाही करणे सद्य:स्थितीत शक्य नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील २३ शिक्षणाधिकारी यांच्या विभागीय चौकशीबाबत

**(४) * १९०९७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यता, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय खाजगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये नवीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येऊ नये असा नियम असतानाही शिक्षकांना नियमबाहय वैयक्तीक मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण आयुक्तालयाने केलेल्या तपासणीत प्राथमिक ४८८, माध्यमीकच्या २८०५ तर उच्च माध्यमीकच्या ७१८ अशा एकूण ४०११ वैयक्तीक मान्यता बेकायदेशीररित्या देण्यात आल्याने २३ शिक्षणाधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याचा निर्णय शासनाने सन २०२२-२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नियमभंग करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशीचे आदेश देऊनही अद्यापपर्यंत त्यांच्याविरूध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीररित्या वैयक्तीक मान्यता देणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांविरुध्द तसेच शिक्षणाधिकारी यांच्या विभागीय चौकशीचे आदेश देऊनही अद्याप कारवाई न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी एका प्रकरणात चौकशीअंती संबंधित अधिकाऱ्याविरूध्द शिक्षा बजाविण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरू आहे. चौकशीअंती संबंधित दोषींविरूध्द प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय विश्रामगृहांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५) * १८८९४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई, उरण (जि.रायगड), कराड (जि.सातारा) येथील शासकीय विश्रामगृहांची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल- मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विश्रामगृहांची दुरवस्था झाल्याने शासकीय कामांसाठी येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असून आरक्षणाशिवाय इतर व्यक्तींना खोल्या दिल्या जात असल्याने गरजूंपेक्षा इतर व्यक्ती या विश्रामगृहांचा वापर करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विश्रामगृहांच्या सोयी-सुविधांसाठी निधी उपलब्ध असूनही सदर विश्रामगृहांची देखभाल व स्वच्छता ठेवण्यात येत नसल्याने त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने विश्रामगृहांची देखभाल व स्वच्छता न करणाऱ्या व आरक्षणाशिवाय इतरांना खोल्या देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच दुरवस्था झालेल्या विश्रामगृहांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. मात्र, काही विश्रामगृहांची दुरुस्ती प्रगतित आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये विज्ञान शिक्षकांची संख्या कमी असलेबाबत

**(६) * १९८५४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या आरेखानुसार जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये ४५ पटसंख्या असलेल्या वर्गासाठी विज्ञान व भाषा या विषयाचे दोन शिक्षक असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हा परिषदेच्या २ हजार ७९८ शाळांपैकी बहुतांश शाळांमध्ये विज्ञान विषयाचे शिक्षकच नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विज्ञान विषयांच्या शिक्षकांची कमतरता भरुन काढण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी -२०२२ मधील गुणांकनाच्या आधारे राज्यातील रिक्त पदांपैकी सुमारे ३०,००० शिक्षकीय पदांची पवित्र प्रणालीद्वारे भरती करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव रिक्त शिक्षकीय पदे तात्पुरत्या स्वरूपात नवीन नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्वावर भरण्याच्या सूचना शासन पत्र दिनांक ०७/०७/२०२३ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागातील शिक्षणाधिकारी व वेतन पथक कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(७) * १९४०३ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील शिक्षणाधिकारी व वेतन पथक कार्यालयातील पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अमरावती विभागातील शिक्षणाधिकारी व वेतन पथक कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अमरावती विभागातील एकूण ५ जिल्ह्यातंर्गत शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/योजना) या पदांची जिल्हा परिषदेसाठी १५ पदे मंजूर असून त्यापैकी ८ पदे कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत अमरावती विभागातील एकूण ५ जिल्ह्यातंर्गत अधीक्षक वेतन व भ.नि.नि. पथक कार्यालयासाठी अधीक्षक संवर्गातील १० पदे मंजूर असून त्यापैकी ८ पदे कार्यरत आहेत.
(२) शासनाकडून पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) येथील समुद्रकिनाऱ्यावरील**
**नादुरूस्त झालेल्या बंधाऱ्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(८) * १९६७९ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६९९० ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील समुद्रकिनाऱ्यावरील बंधारा निसर्ग आणि तोक्ते वादळात उद्‌ध्वस्त झालेला असून मुसळधार पाऊस, लाटांचा मारा यामुळे सदर बंधाऱ्याची अनेक ठिकाणी पडझड झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग समुद्रकिनारी कोळीवाडा ते जिल्हा पोलीस अधीक्षक बंगला या साधारण ४९० मीटर बंधाऱ्याच्या कामाची प्रक्रिया पूर्ण होऊन दोन वर्षापूर्वी कामाला मंजुरी मिळाली असून अद्याप या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अलिबाग समुद्रकिनारी बंधारा बांधण्याचा ठेका एमईसी कन्सल्टंट मरोळ, अंधेरी या ठेकेदार कंपनीला देण्यात आला असून सदर बंधाऱ्याचे काम हे दिनांक २० ऑक्टोबर २०२२ पर्यंत पूर्ण करावयाचे होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बंधाऱ्याला सीआरझेडची परवानगी मिळाली असून सदर ठेकेदारच परागंदा झाला असल्याने पुन्हा नव्याने सदर कामाची निविदा काढून सन २०२२ च्या पावसाळ्यापूर्वी बंधाऱ्याचे काम सुरू करण्यात येईल असे विभागाकडून सांगण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अलिबाग किनाऱ्यावर पर्यटनास येणाऱ्या पर्यटकांना बसण्याची व फिरण्याची सुविधा मिळावी तसेच किनाऱ्यालगत असलेल्या नागरी वस्तीत पाणी शिरू नये यासाठी शासनाकडून सदर बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) सदर कामास दिनांक १४/०२/२०२३ रोजी पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली आहे. सदर कामाची नव्याने निविदाबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्वरीत काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियमित स्वरूपातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) * १८९३६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने २०१० साली मुंबई विद्यापीठासाठी १३१९ पदे मंजूर केली होती त्यावेळी संलग्नित महाविद्यालयांची संख्या ४५० आणि विद्यार्थांची संख्या साडेतीन लाख होती, मागील १३ वर्षांत ८४२ संलग्नित महाविद्यालये आणि विद्यार्थांची संख्या ८ लाख ४ हजारावर पोहचली असून सन २०१३ पासून नियमित स्वरूपातील जागांसाठी रिक्त असलेल्या ६८० पदांपैकी एकही शिक्षकेतर कर्मचारी भरती न केल्याने सध्या कार्यरत असलेल्या ६३९ कर्मचाऱ्यांवर दिवसेंदिवस अतिरिक्त कामाचा ताण वाढत असून

त्याचा विपरित परिणाम विद्यापीठाच्या कामकाजावर होत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातील नियमित स्वरुपातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे ५१ टक्के पदे रिक्त असून महत्वाच्या पदांचा कार्यभार गेले ८ महिने प्रभारी कर्मचारी करित असल्यामुळे परिक्षांचे विस्कळीत वेळापत्रक, प्रवेशपत्रे, प्रलंबित निकाल आणि जाहीर निकालामधील त्रुटी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या कारभारावर विविध विद्यार्थी संघटनांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असणे अशा प्रकारे विद्यापीठाच्या ढिसाळ कारभाराचा नाहक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) मुंबई विद्यापीठातील शिक्षकीय आणि शिक्षकेतर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे. रिक्त पदांचा कार्यभार अतिरिक्त स्वरुपात सोपवून दैनंदिन कामकाज केले जाते. क्लस्टर महाविद्यालये, प्राचार्य, अधिष्ठाता, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, प्राध्यापक यांच्या सहाय्याने उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन विहित वेळेत करण्यात येत असून परीक्षांचे निकाल विहित वेळेतच जाहीर करण्यात येत आहेत.

वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तथापि, विद्यापीठाचे कामकाज सुरळीत चालावे याकरिता अत्यावश्यक शिक्षकेतर पदे भरण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र शिक्षण सेवा ‘गट-क’ मधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०)** * **१९३४५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट - क मंजूर पदे ६६७, कार्यरत पदे ३११, रिक्त पदे ३५६ असून तसेच सेवानिवृत्तीमुळे पदे रिक्त होत असल्याने रिक्त पदांची संख्या वाढत असून मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून मुलाखती घेऊन सदर पद भरती करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब अंतर्गत उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदावर निवडीव्दारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी विभागीय मर्यादित परीक्षा घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विभागीय मर्यादित परिक्षांचे निकाल जाहीर करुन सदर पदे भरण्याबाबत मा.प्रशासकीय न्यायाधिकरणाचे आदेश विचारात घेऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवडप्रक्रिया पूर्ण करून सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदे भरण्यासाठी निवडप्रक्रीयेकरिता आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली येथील एका प्लेग्रुपमधील (बालवाडीतील) मुलांना अमानुष शिक्षा करणाऱ्या शिक्षिकांवर कारवाई करणेबाबत

**(११) * १८९१५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली येथील एका प्लेग्रुपमधील (बालवाडीतील) दोन शिक्षिकांनी दोन ते अडीच वर्षांची मुले आपले ऐकत नाहीत म्हणून त्यांना अमानुष शिक्षा केल्याची संतापजनक घटना माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लेग्रुपमधील (बालवाडीतील) संबंधित लहान बालकांना चिमटे काढणे, हाताला मिळेल त्याने मारहाण करणे, मुलांना उचलून आपटणे अशी क्रूर वागणूक या दोन शिक्षिकांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षण देणाऱ्या संस्था/ आस्थापना यांची मंजुरी, संनियंत्रण, विकास इत्यादी बाबी तसेच पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षणाचा अभ्यासक्रम, पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षण देणाऱ्या संस्था/ आस्थापनांमधील शिक्षकांचे विषय तसेच शालेय शिक्षणाच्या धर्तीवर पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षणाकरिता संस्थात्मक रचना, प्रशासकीय रचना, कालबध्द धोरण, कायदा निर्मितीबाबत शासनाची भूमिका व धोरण काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्लेग्रुपमधील (बालवाडीतील) लहान बालकांना अमानुष शिक्षा करणाऱ्या संबंधित दोषी शिक्षिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून ०३ ते ०६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी बालवाडी वर्ग चालविण्यात येतात. सद्य:स्थितीत एकूण २०० बालवाडी वर्गांना मंजूरी आहे. सदरचे बालवाडी वर्ग हे महानगरपालिकेच्या शालेय इमारतीतच भरवण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतीमध्ये सुरु असलेल्या बालवाडी वर्गामध्ये असा कुठलाही प्रकार झालेला नाही.
(३) महिला व बालविकास विभागाच्या दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदीनुसार बालकांचा शारीरिक विकास, कृती कौशल्यांचा विकास, आकलन विकास, सामाजिक, भावनिक व नैतिक विकास, सांस्कृतिक कलात्मक विकास आणि संवाद व प्रारंभिक भाषा साक्षरता आणि संख्याज्ञान यांचा विकास करणेकरिता अंगणवाडीकरीता सुधारित पूर्व बाल्यावस्थेतील शिक्षण व संगोपन (ECCE Early Childhood Care & Education) बाबत धोरण लागू करण्यात येत आहे. सदर धोरणानुसार केंद्र शासनाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

नुसार पूर्व प्राथमिक अभ्यासक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) यांचेकडून तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या कॅस (वरिष्ठ व निवडश्रेणी) लाभाबाबत

**(१२)** * **१९८४४ श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या कॅस (वरिष्ठ व निवडश्रेणी) लाभाबाबत अत्यंत जाचक अटी असलेला शासन निर्णय व त्यासंदर्भातील मा.संचालक यांचे परिपत्रक अनुक्रमे दिनांक ३ जून, २०२२ व दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील परिपत्रक मागे घेऊन सुलभरितीने शिक्षकांना कॅसचे लाभ देण्याबाबत औरंगाबाद विभाग शिक्षक प्रतिनिधींनी संचालक व सचिव यांना दिलेल्या लेखी पत्राच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

करीअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने आर्थिक लाभ व पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यासाठीच्या निकषात भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (AICTE) वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अधिसूचना विचारात घेऊन शासनाने दिनांक ३ जून, २०२२ चा शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या दिनांक ७ जुलै,२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांकडून कॅस अंतर्गत लाभ देण्याचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.
(२) व (३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या दिनांक ०७ जुलै, २०२२ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने अभियांत्रिकी शिक्षक संघटनेने दिनांक ११ जुलै, २०२२ रोजीचे निवेदन दिलेले आहे.

शासनाचे दिनांक ३/६/२०२२ चे आदेश व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या दिनांक ७/७/२०२३ रोजीच्या परिपत्रका विरोधात शासकीय तंत्रनिकेतनातील काही प्राध्यापकांनी मा.प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज क्रमांक- ८१७ / २०२२ नुसार दावा दाखल केला असून मा.न्यायाधिकरणाने शासनाच्या दिनांक ३/६/२०२२ रोजीच्या शासननिर्णयानुसार करावयाच्या अंमलबजावणीबाबत जैसे थे (Status-quo) आदेश पारित केले आहेत. सबब सद्य:स्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहतींमधील बंद कारखान्यांचे भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(१३) * १९८९५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४२ नोंदणीकृत सहकारी औद्योगिक वसाहती कार्यरत असून, त्यापैकी काही सहकारी औद्योगिक वसाहती अवसायनात गेल्यामुळे तेथील अनेक उद्योग बंद पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकारी औद्योगिक वसाहतींना शासनाने जमीन व पायाभूत सुविधांसाठी अर्थसहाय्य दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहकारी औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेल्या उद्योगांच्या जमिनी ताब्यात घेऊन नवउद्योजक व मागणी करणाऱ्या उद्योगांना जमीनी देण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३०/०६/२०२३ अखेर राज्यात १४२ नोंदणीकृत सहकारी औद्योगिक वसाहतीना मंजूरी असून ९९ सहकारी औद्योगिक वसाहती प्रत्यक्षात सुरू आहेत. त्यामध्ये ८०३७ उद्योग घटक कार्यरत असून १,७९,४७४ लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. तसेच १४ सहकारी औद्योगिक वसाहती या अवसायनात गेलेल्या असून उर्वरीत २९ औद्योगिक वसाहती अद्यापपर्यंत सुरु झालेल्या नाहीत.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात नोंदणीकृत १४२ संस्थेपैकी उद्योग विभागाने भाडेकराराने दिलेल्या एकूण ४८ सहकारी औद्योगिक वसाहती असून जिल्हाधिकारी कार्यालयाने भाडेकराराने दिलेल्या ८ सहकारी औद्योगिक वसाहती आहेत. तसेच स्वत:च्या मालकीच्या जमीनी असलेल्या ७५ औद्योगिक वसाहती असून ऑक्युपंसी प्राईज देऊन जमीनी घेतलेल्या ५ संस्था आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून जमिनी मिळालेल्या ६ सहकारी औद्योगिक वसाहती आहेत.

सन १९६७ ते सन २०१२ पर्यंत शासकीय समभाग भांडवल योजनेंतर्गत पायाभूत सुविधा विकासाकरिता एकूण ५१ औद्योगिक वसाहतींना रुपये १५.८१ कोटी शासकीय समभाग भांडवल म्हणून वितरित करण्यात आले आहे. तसेच औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती व विकास योजनेंतर्गत सन २०१४-१५ ते सन २०२२-२३ या कालावधीत १९ सहकारी औद्योगिक वसाहतींना रुपये ९५.७८ कोटी एवढे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.

सहकारी औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेल्या उद्योग घटकांच्या जमिनी ताब्यात घेऊन नवउद्योजक व अस्तित्त्वात असलेल्या उद्योग घटकांकडून जमीनी देण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली आहे.
(४) सहकारी औद्योगिक वसाहतीतील समस्यांबाबत विकास आयुक्त (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७/०४/२०२३ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्रातील सहकारी औद्योगिक

वसाहतीची संपूर्ण माहिती देण्याबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व) आणि उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालय यांचेकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मावळ (जि.पुणे) येथील शिधापत्रिकाधारकांना त्यांची नावे आधार लिंक नसल्याने धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(१४) * १९७८१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ, जि.पुणे येथे ३५ हजार शिधापत्रिकाधारक असून त्यापैकी ३००० शिधापत्रिकाधारकांची नावे आधारकार्डास जोडणी केली नसल्याचे निदर्शनास आले असून सुमारे १२००० नागरिकांना गेल्या तीन-चार महिन्यांपासून धान्यापासून वंचित रहावे लागले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिधापत्रिकाधारकांची शिधापत्रिका आधार कार्डास जोडून मागील तीन ते चार महिन्यांचे थकीत राहिलेले धान्य तात्काळ त्यांना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात माहे एप्रिल, २०२३ अखेर राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत ३५,०३५ शिधापत्रिकाधारक होते. केंद्र शासनाकडून प्राप्त सुचनांनुसार लाभार्थ्यांचे शिधापत्रिकेसोबत आधार संलग्न करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत जुलै, २०२३ मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत ३७,३८३ शिधापत्रिकाधारकांचे आधार संलग्न करण्यात आले आहे. आधार कार्ड अभावी अन्नधान्यापासून लाभार्थी वंचीत राहीले, अशी तक्रार तहसिल कार्यालय, मावळ यांचाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी सरल प्रणालीवर करण्याबाबत

**(१५) * १९०७९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १८२५१ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरकारी, खाजगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांची आधारसह माहिती माहे नोव्हेंबर,२०२२ पर्यंत सरल प्रणालीवर भरण्याचे आदेश शासनाने दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड उपलब्ध नाहीत, काहींच्या आधारकार्डातील माहिती विसंगत असणे तर काहींना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सदर आधारकार्ड जोडणीचे काम पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील एकूण २,११,४४,४६७ विद्यार्थ्यांपैकी १,९३,४५,१११ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध आढळले आहेत. उर्वरित १७,९९,३५६ विद्यार्थ्यांपैकी ३,०८,८११ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांक घेतलेले नाहीत. तर १४,९०,५४५ विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक वैध ठरलेले नाहीत.
(३) माहितीमध्ये असणाऱ्या त्रुटी/ तफावत दूर करून आधार क्रमांक वैध करण्याबाबत पुढील कार्यवाही शाळास्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षण सेवकांना वाढीव मानधन अद्याप न मिळाल्याबाबत

**(१६) * १९७६४ श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १७३८१ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण सेवकांना वाढीव मानधन देण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून या शासन निर्णयाची अंमलबजावणी माहे जानेवारी,२०२३ पासून करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाकडून राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित होऊन पाच महिन्यांचा कालावधी होऊनसुध्दा २५ हजार शिक्षण सेवकांना वाढीव मानधन देण्यांत आले नसल्याचे दिनांक १३ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढीव मानधनाची रक्कम तातडीने मिळावी अशी मागणी राज्यातील गोंदिया जिल्ह्यासह सर्व शिक्षण सेवकांनी शासनाकडे केली असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भातील घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक ०७/०२/२०२३ नुसार शालार्थ प्रणालीमध्ये शिक्षण सेवक यांची सुधारित मानधन बदलासंदर्भात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्या सुविधेनुसार संबंधित मुख्याध्यापक यांनी आवश्यक दुरुस्तीसह मानधन बदलाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रस्तावास आहरण व संवितरण अधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतर सुधारित मानधनानुसार शालार्थ प्रणालीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याचे सुधारित दरानुसार मानधन अदा करण्यात येत आहे.

तथापि, ज्या शिक्षण सेवकांचे मानधन बदलाबाबतचे प्रस्ताव संबंधित मुख्याध्यापक यांनी सादर न केल्याने काही शिक्षण सेवक यांना सुधारित मानधन अदा करण्यास थोडा अधिकचा अवधी लागत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस शिक्षकांची भरती केल्याबाबत

**(१७) * ११९१८९ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या माहितीनुसार राज्यात सुमारे १२ हजार ६५३ शिक्षक बोगस असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ नंतर शिक्षक भरतीला बंदी असतानाही माध्यमिक शिक्षणाधिकारी, अहमदनगर यांनी बनावट कागदपत्रे तयार करून शिक्षक भरती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात बोगस शिक्षकांची संख्या १४०३ असून सदर घोटाळाबाबत उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांनी त्रिस्तरीय समिती नेमली आहे तसेच या त्रिस्तरीय समितीमधील सदस्यांनी अजून कोणताही अहवाल शासनास सादर न करता त्रिस्तरीय समितीमधील सदस्यांनी स्वतः हून या समितीमधून नावे काढून घेतली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट शिक्षक भरती करून शासनाची फसवणूक करणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकारी, अहमदनगर यांचेवर तसेच बोगस शिक्षकांच्याबाबतीत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सन २०२२-२३ पासून राज्यातील सर्व शाळा, विद्यार्थी तसेच शिक्षकांची आधार वैधतेसह माहिती यु-डायस प्लस प्रणालीमध्ये भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत राज्य स्तरावर सुरु आहे. त्यानुसार राज्यात १२,६५३ शिक्षकांची दुबार नोंदणी झाल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने माहिती तपासून त्याप्रमाणे प्रणालीवर बदल करण्याच्या सूचना सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आल्या. सद्य:स्थितीत

सदर प्रणालीवर राज्यात ४,७१८ शिक्षकांची दुबार नोंदणी असल्याचे दिसून आले आहे. दुबार नोंदणी झालेल्या शिक्षकांची माहिती तपासून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये अद्ययावत करण्यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, समितीमार्फत मोघम स्वरुपाचा अहवाल प्राप्त झाल्याने तक्रारीतील मुद्देनिहाय संचिका तपासून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनियमित मान्यतेच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून देण्याबाबत

**(१८) * १९०२२ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील दूर व मुक्त अध्ययन संस्था म्हणजेच ‘आयडॉल’ विभागाच्या परीक्षा दिनांक २० जून, २०२३ पासून सुरु होत असून आयडॉलमध्ये प्रवेश घेऊन ५ महिन्याचा कालावधी होवूनही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थांना अद्यापपर्यंत छापील स्वरुपात अध्ययन साहित्य देण्यात आले नसल्याचे दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयडॉल विभागामध्ये प्रवेश घेणारे अनेक विद्यार्थी हे काम करून शिक्षण घेत असल्याने छापील स्वरुपातील अध्ययन साहित्य न मिळाल्यामुळे परीक्षेचा अभ्यास करताना विद्यार्थाना अनेक अडचणीं येत असून प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) आयडॉलमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थांकडून प्रवेश शुल्क घेतेवेळी त्यांचेकडून अध्ययन साहित्यासाठी पैसे आकारलेले जात असून विद्यार्थांना पाठ्यपुस्तकांच्या छापील प्रतीही वेळेत देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाणिज्य शाखेची सहाव्या सत्राची परीक्षा (बी. कॉम) दिनांक २० जून, २०२३ आणि कला शाखेची सहाव्या सत्राची परीक्षा (बी.ए.) दिनांक २७ जून, २०२३ पासून सुरु होत असून विद्यार्थांकडून शुल्क घेउनही, विद्यार्थांना आवश्यक ते अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना छापील स्वरुपातील अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत तसेच या प्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठातील दूर व मुक्त अध्ययन संस्थेद्वारे बी कॉम सत्र ६ ची परीक्षा दिनांक २० ते ३० जून, २०२३ या कालावधीत तसेच तृतीय वर्ष बी.ए. ची परीक्षा दिनांक २७ जून, २०२३ ते दिनांक १० जुलै २०२३ या कालावधीत घेण्यात आल्या आहेत.

दूर व मुक्त अध्ययन संस्थेत आजपर्यंत वार्षिक पध्दत होती. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सदरचा अभ्यासक्रम २०२२-२३ शैक्षणिक वर्षात सत्र पध्दतीत परिवर्तीत केला आहे. अध्ययन साहित्य सत्र पध्दतीत प्रथमच तयार करत असल्याने प्रथम इंग्रजी माध्यमात तयार केले जाते व त्यानंतर त्याचे मराठीत रूपांतर केले जाते. अध्ययन साहित्य तयार केल्यानंतर ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाते. तसेच विद्यार्थ्यांसाठी विषयानुसार टेलीग्राम ग्रुपच्या माध्यमातून सॉफ्ट प्रती देण्यात येतात. यानंतर अध्ययन साहित्य हे छापील स्वरूपात दिले जाते. अध्ययन साहित्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

तृतीय वर्ष बी. कॉमसाठी सहा विषय, तर तृतीय वर्ष बी. ए.ला एकूण ११ विषय आहेत. याचे इंग्रजी व मराठी माध्यमातील सर्व विषयाचे अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना दिले गेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना माफक दरातील धान्यासाठी १३ वर्षांपुर्वीची उत्पन्न मर्यादा लागू केल्याबाबत

**(१९)** * **१९५०६ श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व सुरक्षा योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना शिधावाटप दुकानातून माफक दरात अन्नधान्य शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी १३ वर्षांपुर्वीची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा लागु असून त्यानुसार जुन्याच उत्पन्न मर्यादेच्या आधारे ग्रामीण भागात रुपये ४४ हजार तर शहरी भागात रुपये ५९ हजार इतकी उत्पन्न मर्यादा घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील १३ वर्षात महागाई वाढल्याने सद्य:स्थितीत वार्षिक उत्पन्न ५९ हजार इतके राहिलेले नाही त्यामुळे पात्र असूनही नागरिकांना स्वस्त धान्याचा लाभ घेता येत नसल्याचे दिनांक १८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर उत्पन्न मर्यादा वाढविण्यात यावी अशी मागणी पुर्वीच्या पात्र परंतु आता अपात्र ठरणाऱ्या गरीब नागरिकांनी तसेच मुव्हमेंट फॉर पीस ॲण्ड जस्टीस संघटनेने शासनाकडे त्याच सुमारास केली असून अन्यथा आंदोलन करण्याचे सुचित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) होय.

(३) राज्यात दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमांतर्गत केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७००.१६ लक्ष इतका लाभार्थी इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. सदर इष्टांकाच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करणे अपरिहार्य असल्यामुळे दिनांक १७/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेकरिता लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता ग्रामीण व शहरी भागाकरिता अनुक्रमे रुपये ४४,०००/- व रुपये ५९,०००/- इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी दिनांक १५/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून सवलतीतील अन्नधान्याचा लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेल्या नवीन पात्र लाभार्थ्यांचा समावेश राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत करण्यात येत आहे.

(४) दारिद्र्य रेषेखालील नागरिकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्याची आवश्यकता असल्याबाबत मुव्हमेंट फॉर पीस ॲण्ड जस्टीस या संघटनेकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांची निवड करण्याकरिता दिनांक १७/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेत बदल करण्याचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व वेतननिश्चितीबाबत

**(२०) * १८८२३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यासंदर्भात मार्गदर्शन मिळण्याबाबत प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनास प्रस्ताव सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने शासनमान्य पदे व विद्यापीठ फंडातून निर्माण केलेली पदे यांची एकत्रित बिंदुनामावली ठेवली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुंबई विद्यापीठ यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०२० व ११ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनमान्य पदांची बिंदुनामावली वेगळी ठेवणे, विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना समितीच्या मान्यतेने विभागीय पदोन्नती देणे तसेच मुंबई विद्यापीठातील पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची तात्काळ वेतननिश्चिती करण्याबाबत सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई यांना आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) असा प्रस्ताव प्राप्त झाला आहे हे खरे आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून अतिरिक्त माहिती मागविण्यात आली आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबद्दल दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे. त्यामध्ये अश्या कर्मचाऱ्यांचे सेवा नियमितीकरण, उपदान, अंशराशीकरण, रजा रोखीकरण यांची रक्कम शासनाकडे जमा करणे, स्वतंत्र बिंदूनामावली ठेवणे इत्यादी तरतूदींचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाने कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता याद्या अद्ययावत केल्या आहेत. तसेच बिंदूनामावल्या मागासवर्ग कक्ष आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडून प्रमाणित करुन घेतल्या आहेत. विद्यापीठाकडून कर्मचाऱ्यांचे वेतन पडताळणीचे प्रस्ताव सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व अहमदनगर जिल्ह्यात दुधात भेसळ करणाऱ्या दोषींवर गुन्हे दाखल करण्यासाठी प्रभावी व कठोर कायद्याची निर्मिती करण्याबाबत

**(२१) * १९७९१ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड व अहमदनगर जिल्ह्यात दुध भेसळीच्या दोन घटना गत अर्थसंकल्पिय अधिवेशन,२०२३ दरम्यान निदर्शनास आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भेसळयुक्त दुधाच्या सेवनाने लहान बालके व नागरिकांच्या आरोग्य व जीवनमानावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुधात भेसळ करणाऱ्या दोषींवर गुन्हे दाखल करण्यासाठी प्रभावी व कठोर कायद्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार बीड व अहमदनगर जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) भारतीय दंडविधान संहितेच्या कलम २७२ व २७३ मध्ये बदल व दुरुस्ती करण्याबाबतचे विधेयक राज्याच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यानंतर गृह विभागाने केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर केले आहे. सदर विधेयक सद्य:स्थितीत केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील आमदार यात्री निवासाचे बांधकाम निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२२) * २०१४१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या रहिवासासाठी मंदिर परिसरात सर्व पक्षीय आमदारांच्या निधीतून आमदार यात्री निवासाचे बांधकाम आराखडयास सन २००५ मध्ये मंजुरी मिळाली असून, त्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्यानंतर मंदिर समितीच्या सर्व्हे नं.५९/१ मध्ये सन २००९ मध्ये आमदार यात्री निवासाचे बांधकाम सुरु होऊनही निधीअभावी गत १३ वर्षांपासून सदर प्रकल्प अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर आमदार यात्री निवासाचे निधी अभावी अपूर्णावस्थेत असलेल्या बांधकामास निधी उपलब्ध करुन, सदर यात्री निवासी बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर कामास आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत एकूण चार इमारतींच्या बांधकामास दिनांक ११/०७/२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ७ कोटी १४ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर प्रशासकीय मान्यता आदेशात, उपलब्ध निधीच्या तरतूदीनुसार बांधकाम टप्याटप्याने पूर्ण करणे विषयी नमूद केले आहे. त्यामुळे प्राप्त निधीच्या प्रमाणात अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता देण्यात आली. त्यानुसार कामे पूर्ण करुन, इमारत वापरण्यायोग्य करुन हस्तांतरित केलेली आहे. तसेच उर्वरित निधी अद्यापि उपलब्ध झालेला नसल्याने, उर्वरित तीन इमारतींचे बांधकाम हाती घेण्यात आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

सदर चार इमारतींपैकी एका इमारतीचा ताबा मा.विभागीय आयुक्त, पुणे व मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या सूचनेनुसार दिनांक २१/११/२०१३ अन्वये कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांचेकडे हस्तांतरित केला असून उर्वरित कामे मंदिर समिती मार्फत करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी, विठ्ठल रुक्मिणी मंदीर समिती, पंढरपूर यांचे दिनांक १९/०३/२०१४ नुसार निर्णय देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे कौशल्य विकास संस्था उभारणीस विलंब होत असल्याबाबत

**(२३) * १८८३१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणाच्या संधी तालुका स्तरावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यापीठ कायदयात कौशल्य विकास संस्थाबाबत सुचविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कौशल्य विकास संस्था अद्याप कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले असून शासनाने या उपक्रमासाठी सन २०१८ मध्ये अंबाजोगाई व जालना येथे प्रत्येकी २५ एकर दिलेल्या जमिनी विद्यापीठाने ताब्यातही घेतल्या असून विद्यापीठाच्या मनमानी कारभारामुळे ४ वर्षांमध्ये साधा आराखडाही तयार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,अंबाजोगाई व जालना येथे कौशल्य विकास संस्था सुरु झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंबाजोगाई व जालना येथे कौशल्य विकास संस्था सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विद्यापीठाने निधीचा प्रस्ताव सादर केला आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील इंग्रजी शाळांना देण्यात येणाऱ्या आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचे कोटयवधी रुपये थकीत असल्याबाबत

**(२४) * १९४१८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.महादेव जानकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत पाटील, श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विनाअनुदानित खाजगी शाळांना आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागेवर सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक केले असून त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागे शासनाकडून शाळेला प्रतिवर्ष १७ हजार ६७० रुपये अनुदान दिले जात असून कोरोनामुळे मागील ३ वर्षे सरकारने ही रक्कम निम्म्यावर आणून प्रति विद्यार्थी प्रति वर्ष ८ हजार रूपये अनुदान देण्याचे निश्चित केले आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्रापासून पूर्वीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांमागे १७ हजार ७७० रूपये एवढी रक्कम देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर शहरातील काही शाळांना उक्त अनुदान गत तीन वर्षांपासून शासनाकडून मिळालेले नाही तसेच या घटकांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश शुल्काची प्रतिपूर्ती सन २०१७ पासून संबंधित

शाळांना शासनाकडून न झाल्याने तसेच शिक्षणाचा हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) पोर्टलवर अर्ज सादर करताना २५ मार्चपूर्वीची कागदपत्रे असल्याची हमी देऊन अनेक पालकांनी या तारखेनंतरची कागदपत्रे काढल्याने तसेच राखीव ठेवलेल्या जागांवर अर्ज करताना पोर्टलवर अपलोड करण्याची सुविधा नाही या कारणास्तव विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारण्यात येत असून आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शाळा उदासीन असून आरटीई अंतर्गत भरण्यात येणाऱ्या सुमारे १ लक्ष १ हजार जागांपैकी सुमारे ३०% जागा रिक्त राहत असल्याचे दिनांक १४ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे सदर प्रवेश शुल्काची रक्कम सन २०१७ पासून रुपये १ हजार ८०० कोटी शासनाकडून येणे बाकी असल्याचे तर दुसरीकडे याअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश शुल्क भरण्याची सक्ती शाळांकडून करण्यात येत असून शाळांनी विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ९ हजार ५३४ शाळांमध्ये आरटीई प्रवेश दिले जातात, त्यामध्ये ४ लाख विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो तसेच आरटीईचे अनुदान त्या-त्या वर्षात द्यावे असा केंद्र शासनाचा कायदा आहे, यामध्ये केंद्र शासनाचे ६० टक्के आणि राज्याचे ४० टक्के अनुदान दिले जाते तसेच केंद्र शासन दरवर्षी माहे एप्रिल मध्ये २५ टक्के निधी आगाऊ देत असते, पण राज्य शासनाने वरील १५ टक्के खर्च केल्याचे प्रमाणपत्र केंद्र शासनाला सादर केल्यानंतर आरटीईची उर्वरित रक्कम राज्य शासनाला दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी विनाअनुदानित इंग्रजी शाळांना देण्यात येणारे आरटीई प्रतिपूर्तीचे १ हजार ८०० कोटी रूपये थकविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदर थकित रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शासन पत्र दिनांक १२/०५/२०२३ नुसार आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेशाकरिता दिनांक १५/०५/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व मुदतवाढीच्या कालावधीतील दाखले (कागदपत्र) ग्राह्य धरण्याच्या सूचनादेखील देण्यात आल्या होत्या. यास्तव, कोणत्याही विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारण्यात आले नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५)आरटीई २५ टक्के प्रवेश अंतर्गत पात्र शाळांना राज्य शासनाकडून शुल्क प्रतिपुर्ती केली जाते. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनामार्फत शासनास शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम तत्कालीन सर्व शिक्षा अभियान व सध्याच्या समग्र शिक्षा या योजनेतून केली जाते. या योजनेसाठी राज्य शासनाने सन २०२२-२३ पर्यंत ८२७.४९ कोटी इतका निधी खर्च केलेला असून, केंद्र शासनाकडून सन २०२२-२३ पर्यंत राज्य शासनास ४००.६७ कोटी इतक्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात आलेली आहे. सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये आरटीई करिता रुपये २०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## विदर्भ, मराठवाडा विभागातील १४ जिल्ह्यांमध्ये शिधापत्रिकाधारकांसाठी लागू केलेल्या रोख रकमेच्या थेट हस्तांरणाची योजना लागू केल्याबाबत

**(२५) * १९८१२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सुरु केलेल्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना धान्यांऐवजी थेट अनुदानाचा लाभ देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मार्च, २०२३ पासून विदर्भ, मराठवाडा विभागातील १४ जिल्ह्यांमध्ये शिधापत्रिकाधारकांना धान्य देण्याऐवजी तेवढेच पैसे त्यांच्या बँक खात्यात रोख जमा करण्याची ‘रोख रकमेच्या थेट हस्तांरणाची’ योजना लागू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेतंर्गत केशरी शिधापत्रिकाधारकांना लाभ देण्यासंदर्भात सोलापूर जिल्ह्याला इष्टांक प्राप्त झाला होता परंतु जिल्ह्यातील माढा तालुक्यातील एकही लाभार्थी संबंधित यादीत नसल्याने माढा तालुका योजनेच्या लाभापासून वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेमुळे धान्य बाजारातील धान्याची भाववाढ होणार असून शिधापत्रिका-धारकांवरसुध्दा जादा भार पडणार आहे तसेच स्वस्त धान्य दुकानदारांचीसुध्दा राज्यातील सुमारे ५५ हजार दुकाने बंद पडून त्यांची व त्यांच्या कुटूंबियांची उपासमार होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शिधापत्रिकाधारक व स्वस्त धान्य दुकानदारांना ह्या योजनेमुळे आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार असल्यामुळे ही योजना बंद करण्यात यावी, अशी मागणी सातारा जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारस केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ‘रोख रकमेच्या थेट हस्तांरणाची’ ही योजना लागू करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर योजना बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) आणि (२) खरे आहे.

राज्यातील औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक सुमारे ३९ लक्ष पात्र शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्याबाबतचा निर्णय दिनांक २८/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजना सुरू करण्यात आलेल्या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश होत नाही. सबब, सोलापूर जिल्ह्याकरीता ही योजना लागू होत नाही.

(४) हे खरे नाही.
(५) दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(६) भारतीय अन्न महामंडळ यांच्याकडून सदर योजनेस आवश्यक अन्नधान्य उपलब्ध न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक सर्व पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## राज्यात शाळा/महाविद्यालयांलगतच्या परिसरात गुटखा विक्री सुरू असल्याबाबत

**(२६) * १९८८३ श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १३२१२ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असताना शाळा/महाविद्यालय लगतच्या परिसरात सर्रासपणे गुटख्याची विक्री सुरु असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शाळा/महाविद्यालय लगतच्या परिसरात गुटखा विक्री बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३ या कालावधीमध्ये राज्यातील शाळा/महाविद्यालयाच्या परिसरातील एकूण ३९ आस्थापनांची तपासणी केली आली असून त्यापैकी ७ आस्थापनांमध्ये रुपये २४१९/- इतक्या किमतींचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त केला आहे व ७ व्यक्तींविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहेत.

तसेच, शासन अधिसूचना, दिनांक ०९/०१/२०१८ व केंद्र शासनाच्या दिनांक २१/०९/२०१७ च्या अधिसूचनेनुसार लहान मुले व तरुण मुले यांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवणे व त्यांचे आरोग्य आबाधित राहण्यास मदत होईल, अशी जी मानवी आरोग्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी पार पाडण्यासंदर्भात, अशा तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६, कलम-३१ नुसार कारवाया केल्या जातील, असे आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) येथील युनिर्व्हसल बिझनेस स्कूलमध्ये (यूबीएस) विनामान्यता बीबीए अभ्यासक्रम सुरु केल्याबाबत

**(२७) * १९६९७ श्री.जयंत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील युनिर्व्हसल बिझनेस स्कूलमध्ये (यूबीएस) कोणतीही मान्यता नसताना बीबीए अभ्यासक्रम सुरु करून अनेक विद्यार्थांची फसवणूक केल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक, शैक्षणिक नुकसान झाल्या संदर्भात मा.उपमुख्यमंत्री व उच्च तंत्र शिक्षण मंत्री आदींकडे लेखी स्वरुपात तक्रारी केल्या असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ पासून ‘बीबीए’ हा पदवी अभ्यासक्रम यूबीएस मध्ये शिकवला जात असून संस्थेतून आतापर्यंत सुमारे २५० हून अधिक विद्यार्थी शिकून बाहेर पडले आहेत. त्यांना यूकेतील कार्डिफ मेट्रोपॉलिटन युनिव्हर्सिटीची ‘बीए बिझनेस ॲण्ड मॅनेजमेंट स्टडीज (ऑनर्स)’ ही पदवी प्रदान केली आहे. मात्र ‘यूबीएस’ने अभ्यासक्रमासाठी भारतीय विश्वविद्यालय संघ (एआययू) या संस्थेची समकक्षता व अन्य नियामक संस्थेची मान्यता न घेताच हा अभ्यासक्रम शिकवला जात होता विद्यार्थ्यांचा आरोप आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची गंभीर दखल घेत शिक्षण विभागाने महाराष्ट्र कृषी, पशू व मत्सविज्ञान, आरोग्यविज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील भारतीय विश्वविद्यालय संघ तरतुदीनुसार संस्थेची चौकशी करण्याचे निर्देश विभागीय सहसंचालकांना दिले असून या प्रकरणाची प्रत्यक्ष चौकशी करून त्याबाबतचा अहवाल स्पष्ट अभिप्राय व आवश्यक कागदपत्रांसह संचालनालयास तत्काळ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षण विभागाने दिलेल्या सदरहू निर्देशानुसार विभागीय सह संचालक यांच्याकडून या बाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदरहू अहवालानुसार या प्रकरणी शासनाने पुढे कोणता निर्णय घेतला आहे;

(५) असल्यास, मान्यतेशिवाय अभ्यासक्रम सुरु करून विद्यार्थ्यांचे आर्थिक आणि शैक्षणिक नुकसान करणाऱ्या संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कर्जत (जि.रायगड) येथील युनिर्व्हसल बिझनेस स्कूल (यूबीएस) या शैक्षणिक संस्थेमध्ये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून BABM (Bachelor of Arts in Business Management) हा तीन वर्षाचा व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम चालविण्यात येत आहे. आतापर्यंत सदर संस्थेतुन ११० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेले आहेत.

महाराष्ट्र कृषी, पशू व मत्सविज्ञान, आरोग्यविज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील प्रकरण २ कलम ३ नुसार BABM (Bachelor of Arts in Business Management) हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या समुचित प्राधिकरणाची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

(३) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांनी दिनांक २२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कर्जत येथील युनिवर्सल बिझनेस स्कूल या संस्थेतील अनियमिततेबाबतचा अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना सादर केला आहे, हे खरे आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल यांनी चौकशी करून त्यांचा अहवाल दिनांक २२/०५/२०२३ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यावसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासपाठ्यक्रम प्रतिबंध अधिनियम, २०१३ मधील कलम ६ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन आवश्यक कार्यवाही करणेबाबत संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांना शासनाचे दिनांक १४/०७/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील चिनॉय महाविद्यालय पुन्हा सुरु करण्याबाबत

**(२८) * १८९३५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील चिनॉय महाविद्यालय व्यवस्थापनाने मनमानी पध्दतीने महाविद्यालय बंद करून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने हजारो पालकांनी आणि परिसरातील नागरिकांनी दिनांक १८ मे, २०२३ रोजी सदरहू महाविद्यालयाच्या प्रवेश द्वारावर आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय तसेच धर्मादाय आयुक्तांनी सदरहू महाविद्यालय पुनश्च सुरु करण्याचे आदेश दिले असतानाही महाविद्यालय व्यवस्थापनाकडून आदेशाची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू महाविद्यालय पुनश्च सुरु करण्याबाबत हेतुपुरस्सर टाळाटाळ करणाऱ्या महाविद्यालय व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) चिनॉय महाविद्यालय प्रवेशव्दारावर दिनांक १८/०५/२०२३ रोजी वेळ स. ११.१५ ते ११.४५ वा. कालावधीतमध्ये २०-२५ जनसमुदायाच्या उपस्थितीत आंदोलन पार पडले, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय तसेच धर्मादाय आयुक्त यापैकी कोणाच्याही आदेशांच्या प्रती महाविद्यालयास प्राप्त नाही, असे महाविद्यालयाने दिनांक १०/०७/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) सदर वरिष्ठ महाविद्यालय आजच्या स्थितीस सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत पटसंख्येच्या निकषानुसार दिलेल्या अनुदानाबाबत

**(२९) * १९३३० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना सन २०२३ चे संयुक्त अनुदान समग्र शिक्षा अभियानांतर्गत पटसंख्येच्या निकषानुसार अनुदान सन २०२१ च्या युडायसप्रमाणे तालुकास्तरावर प्रणालीमध्ये लिमिट स्वरूपात शाळांच्या वेंडर खात्यावर जमा करण्यात आले असून सदर अनुदान शाळेच्या भौतिक खर्च, आवर्ती खर्च,खेळाचे साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी, शाळेचे वीज बील स्वच्छता आणि अन्य सुविधेसाठी देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंजूर निधी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता असून आर्थिक वर्ष माहे मार्च, २०२३ पूर्वी खर्च करावे आणि निधी व्यपगत झाला तर सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापकांची राहिल असे स्पष्ट आदेश देण्यात आले होते, त्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी पटसंख्येनुसार आलेले अनुदान खर्च केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, १०० टक्के अनुदान मिळणार म्हणून मुख्याध्यापकांनी १०० टक्के रक्कम खर्च केली असून जिल्हा परिषद विभागाने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी एकूण रकमेपैकी ३० टक्के अनुदान खर्च करून उर्वरित रक्कम शासनाकडे परत वर्ग करावी. शासनाकडून उर्वरित ७० टक्के रकमेतून साहित्य देण्यात येईल असे आदेश देण्यात आले असून जिल्हा परिषद शाळांना आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या कार्यालयाकडून शाळांनी निधी खर्च करण्याबाबत सूचना देण्यात येतात. त्यानुसार निधी प्राप्त झाल्यानंतर संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडून अनुदान खर्च केले आहे. उर्वरित निधी राज्य प्रकल्प संचालक यांचे आदेश दिनांक २४/०२/२०२३ अन्वये पीएफएमएस प्रणालीद्वारे राज्य कार्यालयाने वळता करून घेतलेला आहे. तसेच संयुक्त शाळा अनुदानाच्या ७० टक्के रक्कमेमधून साहित्य देण्यात येईल याबाबत कोणतेही आदेश राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा)यांचेकडून देण्यात आलेले नाहीत. शाळांच्या आर्थिक नुकसानीबाबतची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

----------------

## नवी मुंबईत महाराष्ट्र भवनाची उभारणी करण्याबाबत

**(३०) * १९८३७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक १६०४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९८ पासून शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) नवी मुंबईतील वाशी येथील आठ हजार चौरस मीटरचा भूखंड महाराष्ट्र भवनाच्या उभारणीसाठी राखीव ठेवला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईत अन्य राज्यांची भवन दिमाखात उभारण्यात आल्याचे तथापि, महाराष्ट्र भवनासाठी जागा राखीव ठेवलेली असताना महाराष्ट्र राज्याचे भवन अद्याप उभारण्यात आले नसल्यामुळे महाराष्ट्र भवन नवी मुंबईत उभारण्यात यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व नागरीकांनी वारंवार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबईत महाराष्ट्र भवन उभारणीसाठी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रुपये १०० कोटी रकमेची आर्थिक तरतूद करण्यात आल्याचे घोषित केले आहे व सिडको प्राधिकरणाकडून नवी मुंबई येथील सेक्टर-३० अ येथील एकूण ८३२२.९१ चौ.मी. जागा सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात आली असून मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून महाराष्ट्र भवनासाठी आवश्यक नकाशे व आराखडे तयार करण्याचे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र भवन उभारणीप्रकरणी आराखडे तयार करण्याचे काम पूर्ण करुन महाराष्ट्र भवन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ३/०३/२०२० रोजीच्या बैठकीत, नवी मुंबई, वाशी येथील सेक्टर ३०-अ मधील शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या (सिडको) मालकीच्या भूखंड क्र.११ ते १४, एकूण ८३२२.९१ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र भवन तथा विश्रामगृहाच्या बांधकाम व व्यवस्थापनाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय घेतल्याबाबत सिडकोने दिनांक ५/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(२) खरे आहे.
(३) तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणात नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात येऊन त्यासाठी रुपये १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा केली आहे. सिडको प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक १६/०६/२०२२ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.क्र.१, ठाणे यांना सदर जागेचे अलॉटमेंट लेटर देण्यात आले आहे. सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत महाराष्ट्र भवनाकरीता रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सिडको प्राधिकरणाकडे आजपावेतो रुपये ३४.३८ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच, सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत महाराष्ट्र भवनाकरीता रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. तथापि, सदर इमारतीचे बांधकाम सिडको प्राधिकरणामार्फत करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## सातपूर व अंबड (जि.नाशिक) परिसरातील औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेल्या उद्योगांचे भूखंड अन्य कंपन्यांकडे हस्तांतरित करणेबाबत

**(३१)** * **१९९५२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर व अंबड (जि.नाशिक) परिसरातील औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेल्या उद्योगांचे भूखंड शासनाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे अनेक उद्योजकांनी भूखंडाची मागणी केलेली असतानाही बंद पडलेल्या कंपन्यांचे भूखंड बांधकाम विकासकांना दिले जात असल्याचा आरोप उद्योजकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्योग विभागाकडून गेल्या अनेक वर्षांपासून या औद्योगिक वसाहतींचे सर्वेक्षण झालेले नसल्यामुळे बंद पडलेल्या उद्योगांची आकडेवारी उपलब्ध नाही, तसेच बांधकाम विकासकांकडून ३३ औद्योगिक भूखंडावर अनधिकृत निवासी इमारती बांधण्यात आल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर औद्योगिक भूखंडावर झालेले अनधिकृत निवासी बांधकाम निष्काषित करुन सदर भूखंड अन्य कंपन्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) हे खरे नाही.

मऔवि महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमधील बंद पडलेल्या उद्योगाचे भूखंड शासनाकडे हस्तांतरण करण्याचे धोरण अस्तित्वात नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्ह्यातील सातपूर औद्योगिक क्षेत्रामध्ये १६ व अंबड औद्योगिक क्षेत्रामध्ये १३ उद्योग बंद पडलेले आहेत.

सातपूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. ६७ (क्षेत्र २०३२३ चौ.मी.) चे मे. बिएसएफ फोर्जिन लि. स्टेट बँक ऑफ इंडिया या वित्तीय संस्थेचे थकबाकीदार ठरल्याने DRT न्यायालयांच्या आदेशान्वये ०५ भूखंडात विभाजन करुन हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

अंबड औद्योगिक क्षेत्रातील मे. सुमित मशिन्स लि. यांना भूखंड क्र. ए-११/२ व ए-११/३ या भूखंडांचे मा.उच्च न्यायालय (DRT) च्या आदेशान्वये २७ भूखंडात विभाजन करुन हस्तांतरण करण्यात आलेले आहेत.

तसेच सातपूर औद्योगिक क्षेत्रामधील नाईस अंतर्गत ३३ भूखंडावर अनधिकृत निवासी बांधकाम आहेत.

(४) सातपूर औद्योगिक क्षेत्रामधील नाईस अंतर्गत भूखंडावर अनधिकृत निवासी वापर करणाऱ्यांवर ३३ पैकी १५ भूखंड धारकांवर मऔवि महामंडळामार्फत मा.न्यायालय, नाशिक येथे न्यायालयीन दावा क्र. आरसीसी ४४७/२०१२ दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तर, उर्वरित १८ भूखंडाधारकांना कार्यकारी अभियंता तथा वि.नि.प्रा., मऔविम, नाशिक यांचे कार्यालयामार्फत निवासी वापराबाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मोठ्या उद्योगधंद्यांचे झालेले स्थलांतरण व गुंतवणूकीसंदर्भात "श्वेतपत्रिका" (white paper) काढण्याबाबत

**(३२) * १९७६६ श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे झालेले स्थालांतर व गुंतवणूक यासंदर्भात "श्वेतपत्रिका" (White paper) काढण्याचे तसेच त्याबाबत चौकशी करण्याकरीता सेवानिवृत्त न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यांची समिती नेमण्याची घोषणा माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.उद्योग मंत्री महोदयांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर सात महिन्याचा कालावधी होऊनही शासनाने श्वेतपत्रिका काढण्याबाबत व त्यासंदर्भातील चौकशी समिती अद्याप नियुक्त केलेली नसल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर येत्या ७ ते ८ दिवसांत श्वेतपत्रिका सादर करण्याचे व चौकशी समिती नियुक्त करण्याचे मा.उद्योग मंत्री महोदयांनी प्रसार माध्यमासमोर सांगितले असल्याचे दिनांक २८ मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जाहीर केलेली श्वेतपत्रिका अद्याप न काढण्याची व चौकशी समिती स्थापन न करण्याची कारणे काय आहेत, तसेच श्वेतपत्रिका काढण्याबाबत व चौकशी समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) मा.मंत्री (उद्योग) यांनी वेदांता, टाटा एअरबस सी २९५, सॅफ्रन व बल्क ड्रग पार्क या प्रकल्पांबाबतचा वस्तुस्थिती अहवाल सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार राज्यातील मोठे उद्योगधंदे राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याबाबतचा अहवाल विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधीमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात धान्य व कडधान्यांसह डाळींच्या दरात वाढ झाल्याबाबत

**(३३) * १९१९३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवकाळी पावसामुळे धान्याच्या दरावर परिणाम होऊन गहू, ज्वारी, बाजरीच्या तसेच डाळी,धान्य, कडधान्याच्या दरात मोठी वाढ झाली असल्याचे दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धान्य, कडधान्य, डाळी यांचे दर नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.
(२) जास्त प्रमाणात दरवाढ होऊ नये यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक ०२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार तूर व उडद डाळींचे घाऊक/किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स / इम्पोटर्सकरीता साठा निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सदर डाळीकरीताचे साठा निर्बंध दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ पर्यंत लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दिनांक १२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार गव्हाच्या घाऊक / किरकोळ व्यापारी, बिग ‘चेन रिटेलर्स, प्रोसेसर्स करीता साठ्यावरील निर्बंध हे दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत. तसेच, साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याच्या संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात आल्या असून, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार राज्य शासनाच्या पुरवठा यंत्रणेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे समर्थनगर (ता.जि.सातारा) ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची अपूर्णावस्थेतील कामांची चौकशी करुन ठेकेदारावर कारवाई करणेबाबत

**(३४) * २०००७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर-सातारा-रहीमतपुर-पुसेसावळी-विटा रोड (जि.सातारा) येथील राज्यमार्ग १४० या रस्त्याचे मौजे समर्थनगर (ता.जि.सातारा) या ग्रामपंचायत हद्दीमधील प्रतापचौकातील काम तसेच एमएसईबीचे खांब तसेच डिपी स्थलांतरीत न करता बऱ्याच ठिकाणची रस्त्यावरील पुलांची कामे व गोडोली ते धाणेर या भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची कामे ठेकेदारांने अपूर्णावस्थेत ठेवले असल्याचे सार्वजनिक

बांधकाम (पश्चिम) विभाग यांनी त्यांचे दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मान्य केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांवरील कामे अपूर्णावस्थेत असल्यामुळे तेथील स्थानिक ग्रामस्थांना तसेच वाहनधारकांना फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे तसेच रस्त्यावर रोज २ ते ३ अपघात होत असल्याने नागरीकांचे शारिरीक व आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गावरील अपूर्ण राहिलेल्या कामांची चौकशी करुन ठेकेदारावर कारवाई करणेत यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी, प्रवासी व वाहनचालकांनी शासनाकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सदर रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली व सदर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदरचे काम हायब्रीड अन्युईटी योजनेंतर्गत प्रगतीत असून सद्य:स्थितीत ९२% काम पूर्ण झाले आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे दिनांक ३/०४/२०२३ च्या पत्रान्वये उद्योजकास सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे उर्वरीत कामे पूर्ण करणेकरता कळविले आहे.

(२) प्रकल्पातील काही कामे अपूर्ण असल्याने वाहतूकीस गैरसोय होते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर कामाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे संबंधित उद्योजकावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुंभार पिंपळगांव (ता.घनसांगवी, जि.जालना) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेच्या व्यवस्थापक यांनी पी.एम.जी.पी. योजनेचा दुरूपयोग करून फसवणुक केल्याबाबत

**(३५)** * **२०६३७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभार पिंपळगांव (ता.घनसांगवी जि.जालना) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेचे व्यवस्थापक यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२१ ते दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत पी.एम.जी.पी. या सरकारी योजनेचा दुरूपयोग करून बँकेच्या ५६ खात्यांमध्ये रुपये ४,८२,२२,००० (चार कोटी ब्याऐंशी लक्ष बावीस हजार) ची बनावट कागदपत्रे तयार करून फसवणुक केल्याचा गुन्हा दिनांक ४ जून, २०२२ रोजी घनसांगवी पोलीस स्टेशन येथे दाखल झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरील घोटाळ्यात शाखा व्यवस्थापक,उद्योग निरीक्षक,जिल्हा महाव्यस्थापक - जिल्हा उद्योगकेंद्र यांचा सहभाग असूनही सदर गुन्ह्याचे चार्जशीट अद्यापर्यंतदाखल करण्यात आलेले नसल्याने सुमारे ५ कोटींचा भ्रष्टाचारअसूनही सदरील घोटाळा जाणीवपूर्वक दडपण्याचा वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने या भ्रष्टाचारास जबाबदार असणारे शाखा व्यवस्थापक,उद्योग निरीक्षक,जिल्हा महाव्यस्थापक - जिल्हा उद्योगकेंद्र यांचेवर तसेच सदर भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

कुंभार पिंपळगाव (ता.घनसांगवी, जि.जालना) येथील महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखेचे व्यवस्थापक यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२१ ते दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत पी.एम.ई.जी.पी. या सरकारी योजनेचा दुरूपयोग करून बॅंकेच्या ५६ खात्यामध्ये बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याचा गुन्हा दिनांक ४ जून, २०२२ रोजी घनसांगवी पोलीस स्टेशन येथे दाखल झालेला आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी संबंधित बॅंक शाखा व्यवस्थापक यांचेवर बॅंकेने कारवाई करून त्यांना दिनांक २७/१०/२०२१ रोजी निलंबित केलेले आहे. तसेच उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सदर घोटाळयात संबंधित जिल्ह्याचे महाव्यवस्थापक व उद्योग निरीक्षक यांचा सहभाग नसल्याचे कळविले असल्याने त्यांचेवर कार्यवाही करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तरसोद-चिखली (जि.जळगाव) या चौपदरी महामार्गावर वेग मर्यादेचे फलक लावण्याबाबत

**(३६)** * **२०१४९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तरसोद-चिखली (जि.जळगाव) या नव्याने तयार झालेल्या चौपदरी महामार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून वेग मर्यादेचे कोणतेही फलक न लावता रस्ता वाहतूक पोलिसांकडून वाहनात बसविलेल्या कॅमेरा स्पीड गन यंत्राद्वारे अवाजवी रक्कम दंड म्हणून आकारली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महामार्गावर ठीक ठिकाणी वेग मर्यादेचे फलक लावणेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच वेग मर्यादेचे फलक न लावता रस्ता वाहतूक पोलिसांकडून वाहनात बसविलेल्या कॅमेरा स्पीड गन यंत्राद्वारे अवाजवी रक्कम दंड म्हणून वसूल करणाऱ्या सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही. रसोद-चिखली (जि.जळगाव) या नव्याने तयार झालेल्या चौपदरी महामार्गावर निविदाशर्तीनुसार वेगमर्यादेचे फलक लावण्यात आले आहेत.

तसेच गृह विभागाने कळविल्यानुसार जळगांव पोलीस घटकात महामार्ग / रस्त्यावर वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरुध्द कारवाई करण्याकरीता एक इंटरसेप्टर वाहन उपलब्ध असून वाहतूक पोलीसांकडून अवाजवी दंड आकारले जात नसून मोटार वाहन कायद्यान्वये निर्धारित दंड आकारण्यात येतात.

सदर राष्ट्रीय महामार्ग हा केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे अखत्यारित येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टेंभापुरी व धामोरी (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) गावालगतच्या नळकांडी पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(३७) * १८८६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभापुरी (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) मध्यम प्रकल्पाच्या खालील भागात ५०० मीटर अंतरावर टेंभापुरी व धामोरी गावालगत नदीवर नळकांडी पूल आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभापुरी व धामोरी येथील नदीवरील नळकांडी पुलाची लांबी ३० फुटाची असून टेंभापुरी मध्यम प्रकल्प भरल्यावर धरणातून सांडव्याद्वारे मोठ्या प्रमाणावर नदीतून पाणी वाहत असल्याने नळकांडी पुलाच्यावर ३ ते ४ फुट पाणी कायम वाहत असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलावरुन पाणी वाहत असल्याने पिंपरखेडा, लांझी, चंडीकापूर, अंतापूर, धामोरी, टेंभापूरी येथील शेतकरी,ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना प्रवासासाठी अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नळकांडी पुलाची ५ फुट उंची वाढविण्यासाठी बऱ्याच दिवसांपासून शेतकरी, स्थानिक नागरिक पाटबंधारे विभागाकडे पाठपुरावा करित असून टेंभापूरी, धामोरी येथील नळकांडी पुलाची किमान ५ फुट उंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अतिवृष्टी दरम्यान टेंभापुरी मध्यम प्रकल्प भरल्यानंतर सांडव्यावरुन पाणी सोडल्यावर, सदर नळकांडी पुलावरुन पाणी वाहते. या कालावधीकरीता पूलावरुन वाहतूक बंद करावी लागते.

(४) सदर ठिकाणी उच्च पातळीच्या नवीन पुलाचे बांधकाम करण्यास निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## राज्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान मिळणेबाबत

**(३८) * १९३५५ श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालये आणि विधी महाविद्यालयांना अनुदान दिले असून नंतरच्या काळात व्यावसायीक महाविद्यालयांपैकी २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या विधी महाविद्यालयांना ही (Law Colleges) अनुदान प्राप्त झाले आहे तसेच ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालये सुरू असून त्यापैकी ८० महाविद्यालये अनुदानास पात्र असताना त्यांना अद्याप अनुदान दिलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी सदर सर्व महाविद्यालयांची अनुदान देण्यासंदर्भात तपासणी करून अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर दिनांक २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेली असून सन २००१ पासून कायम विनाअनुदान धोरण स्विकारलेले असल्याने सदर महाविद्यालयांना अनुदान अनुज्ञेय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(३९) * १९८४३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १७२४८ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामर्गाचे चौपदरीकरणाचे काम गत १२ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई ते गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या काम केव्हा सुरु करण्यात आले त्यावर किती खर्च करण्यात आला आहे, तसेच कामांची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, या रस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील ३६६ कि.मी. लांबीपैकी २४५ कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले उर्वरित १२१ कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी १२१ कि. मी. प्रगतीप्रथावर असणारे चौपदरीकरणाचे काम तसेच महामार्गाचे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मुंबई -गोवा महामार्गाची पनवेल ते इंदापूर ही ८४ कि.मी. लांबी केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व इंदापूर ते झाराप ही ३५५ कि.मी. लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अखत्यारित आहे.

मुंबई -गोवा महामार्गाची पनवेल ते इंदापूर ह्या लांबीचे काम माहे डिसेंबर २०११ मध्ये सवलतदारास बीओटी तत्वावर दिले होते. विहीत मुदतीमध्ये काम पूर्ण करु न शकल्यामुळे माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये सवलतदारास टर्मिनेट करण्यात आले. तद्नंतर नवीन कंत्राटदाराची नेमणुक करण्यात येऊन उर्वरित काम हाती घेण्यात आले आहे. या लांबीसाठी रुपये ५४० कोटी एवढा खर्च झालेला आहे. सद्य:स्थितीत या लांबीमध्ये १५.२० कि.मी. एका मार्गिकेचे व्हाईट टॉपिंगचे काम झाले असून कासु ते इंदापूर या लांबीचे कॉंक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

इंदापूर ते झाराप या लांबीच्या प्रारुप आराखड्यास माहे जून २०१३ मध्ये केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली व तद्नंतर या लांबीमधील ८०% ते ९०% संपादीत जागा ताब्यात आल्यानंतर प्रत्यक्ष काम सन २०१७-१८ दरम्यान सुरु झाले. सद्य:स्थितीत महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. यावर आतापर्यंत रुपये ३३७४.११ कोटी एवढा खर्च झालेला असून सद्य:स्थितीत ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

३५५.२८ कि.मी. एवढया डिझाइन लांबीपैकी २६४.६० कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(४) उर्वरित ९०.६८ कि.मी. लांबीतील काम प्रगतीत असून डिसेंबर २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४०) * १९१९४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, भाषेचा शिक्षणात, शासकीय कामकाजात वापर व्हावा यासाठी मराठी भाषेचे सर्वंकष धोरण तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने सदर धोरणाचा मसुदा शासनास सादर केल्याचे माहे मे-२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांनी दिनांक ०८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्री.सदानंद मोरे, तत्कालीन अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांनी शासनास सादर केलेल्या मराठी भाषा धोरणाच्या

मसुद्यातील शिफारशींमध्ये काही नवीन बाबी अंतर्भूत करुन सुधारीत मराठी भाषा धोरण मसुदा-२०२३ शासनास सादर केला आहे.

सदर मराठी भाषा धोरणाच्या मसुद्यातील व्यवहारक्षेत्रनिहाय महत्वाच्या व नव्याने अंतर्भूत मुद्यांसंदर्भात अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित मंत्रालयीन विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त असल्याने दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधित मंत्रालयीन विभागांकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.